16-05-2025-Dai-01_DH_PAN_01_04_2016-1.qxp 5/15/2025 11:01 PM Page 1



कदंबचे पणजी बसस्थानक झालेय घाणीचे ठिकाण ! पान ३ वर

आपलं, आपल्यासाठी, सर्वांसाठी

# दैनिक हेराल्ड

www.dainikherald.com




बीसीसीआय ऑलिंपिकसाठी पुढे सरसावले पान ४ वर

वेर्णा, शुक्रवार, १६ मे २०२५ | पाने ४ | ₹ ४ | REG. NO. G2/RNP/GOA/101/2021-23 | Volume 13, Issue 253 | Verna, | facebook.com/dainikherald | Friday 16 May 2025 | Pages 4 | ₹ 4

## निवडक

### पाकिस्तानला साथ देणाऱ्या तुर्कीला भारताचा दणका

**मुंबई, दि. १५ :** एकीकडे भारत दहशतवादाविरोधात लढत असताना त्या विरोधात भूमिका घेत पाकिस्तानला साथ देणाऱ्या तुर्कीला आता मोठा दणका बसला आहे. भारतातील प्रमुख विमानतळांवर हँडलिंग सेवा देणाऱ्या तुर्कीच्या कंपनीचे कामाचे लायसन्स भारताने रद्द केलं आहे. मंत्रालयाने दिलेल्या माहितीनुसार, भारतातील विविध भागांमधून तुर्की कंपनीच्या भूमिगत हँडलिंग सेवांवर बंदी घालण्याची मागणी होत होती. राष्ट्रीय सुरक्षेच्या दृष्टीने ही मागणी गंभीर असून नागरी विमान वाहतूक मंत्रालयाने संबंधित कंपनीचा सुरक्षा मंजुरी रद्द केली आहे.
तुर्कीच्या कंपनीकडून भारतातील दिल्ली, मुंबई, बेंगळुरू, हैदराबाद, कोचीन, अहमदाबाद, गोवा, कन्नूर आणि चेन्नई या विमानतळांवर भूमिगत हँडलिंग आणि कार्गो ऑपरेशन्स सेवा पुरवण्यात येत होत्या.
सिक्युरिटी क्लिअरन्स रद्द केल्यानंतर संबंधित कंपनीला भारतातील विमानतळांवर भूमिगत हँडलिंग सेवा पुरविण्याचा अधिकार नसणार आहे. यामुळे या कंपनीच्या भारतीय ऑपरेशन्सवर परिणाम होईल. राष्ट्रीय सुरक्षेची आणि देशाच्या हिताची रक्षा करणे हे सरकारचे सर्वोच्च प्राधान्य आहे. या निर्णयामुळे भारतीय हवाई क्षेत्राच्या सुरक्षेत वाढ होईल असं केंद्र सरकारने म्हटलं आहे.

### मायक्रोसॉफ्ट ६000 कर्मचाऱ्यांना नारळ देणार

**मुंबई, दि. १५ :** जगातील प्रमुख सॉफ्टवेअर कंपनी असलेल्या मायक्रोसॉफ्टने कंपनीत काम करणाऱ्या तीन टक्के कर्मचाऱ्यांना कमी करण्याचा निर्णय आहे. त्यामुळे या कंपनीतील ६,000 लोकांच्या नोकऱ्या जाणार आहेत. कंपनीच्या आर्थिक हितासाठी कंपनीकडून काही महत्त्वाचे बदल करण्यात येत असल्याचं मायक्रोसॉफ्टच्या प्रवक्त्यांनी सांगितलं आहे. मायक्रोसॉफ्ट कंपनीमध्ये सध्या २.२५ लाख कर्मचारी कार्यरत आहेत.
गेल्या दोन वर्षांपासून मायक्रोसॉफ्टमध्ये कर्मचाऱ्यांना कामावरुन कमी करण्याची प्रक्रिया सुरू झाली असून आताची संख्या ही सर्वात मोठी आहे. २०२३ साली कंपनीच्या १0 हजार कर्मचाऱ्यांना कमी करण्यात आलं होतं.
मायक्रोसॉफ्ट कंपनीमध्ये अनावश्यक कर्मचाऱ्यांना कमी करून त्या ठिकाणी आर्टिफिशिअल इंटेलिजन्सचा मोठ्या प्रमाणात वापर करण्यात येणार असल्याची माहिती आहे. मायक्रोसॉफ्टमधील ही कपात ही तंत्रज्ञान उद्योगात सुरू असलेल्या बदलाचा एक भाग आहे. कारण कंपन्या क्षमता वाढवण्यासाठी आणि एआयसारख्या उदयोन्मुख तंत्रज्ञानात गुंतवणूक करण्यासाठी त्यांच्या कामकाजाची पुनर्रचना करत आहेत.

### मध्य प्रदेशच्या मंत्र्यावर गुन्हा दाखल

**भोपाळ, दि. १५ :** कर्नल सोफिया कुरेशी यांच्याबद्दल वादग्रस्त करणारे भाजपा मंत्री विजय शाह अडचणीत सापडले आहेत. मध्य प्रदेश उच्च न्यायालयानं विजय शाह यांच्या वक्तव्याबाबत कठोर भूमिका घेतली आहे. विजय शाह यांच्यावर पुढील चार तासात एफआयआर करण्यात यावी, असे निर्देश मध्य प्रदेशच्या डीजीपींना दिले आहेत. न्यायालयीन आदेशानंतर तात्काळ गुन्हा दाखल करण्यात आला आहे. दरम्यान, या प्रकरणाची पुढील सुनावणी गुरुवारी होणार आहे. भाजपा मंत्री विजय शाह यांनी कर्नल सोफिया कुरेशींबद्दल वादग्रस्त वक्तव्य केले होते. त्यांनी आपल्या मुलींचे कुंकू पुसले होते, त्या लोकांना आम्ही त्यांच्याच बहिणीला पाठवून चांगलाच धडा शिकवला. त्यांनी आमच्या हिंदूंना कपडे काढून मारले, तर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी त्यांच्याच समाजातील बहिणीला पाठवले की, जेणेकरुन ज्यांनी आमच्या बहिणी विधवा केल्या, त्यांना त्यांच्या समाजातील बहीण नग्न करुन सोडेल', असे विजय शाह म्हणाले होते.

# धक्कादायक! गोव्याच्या शासकीय होस्ट सर्व्हरवर सायबर हल्ला !

■ टीम दैनिक हेराल्ड :

**पणजी, दि. १५ : राज्यातील सरकारी संकेतस्थळांच्या होस्ट सर्व्हरवर झालेल्या सायबर हल्ल्यामुळे एकूण ६२ शासकीय विभागांचे पोर्टल्स बंद पडले आहेत, अशी माहिती आरोग्यमंत्री डॉ. विश्वजित राणे यांनी गुरुवारी दुपारी ३ वा ३५ मिनिटांनी आपल्या ट्वीटर पोस्ट द्वारे दिली. आरोग्यमंत्र्यांनी एक्स या सोशल मीडिया मंचावर पोस्ट करत म्हटले की, पॅनल मध्ये समाविष्ट असलेल्या सर्व्हरची सुरक्षाभिंत भेदली गेली असून त्याची झळ ६२ सरकारी संकेतस्थळांना बसली आहे. मात्र माध्यमांचे लक्ष प्रामुख्याने महिला व बाल विकास (डब्ल्यूसीडी) विभागाच्या सायटवर केंद्रीत होताना दिसते आहे .**



**६२ विभांगांचे पोर्टल्स बंद पडल्याचा खुद्द आरोग्यमंत्र्यांचा दावा**

मंत्री विश्वजित राणे यांनी केलेल्या ट्वीटमध्ये असे म्हणण्यात आले आहे की , महिला आणि बाल विकास विभागाच्या अधिकृत वेबसाइटवर अलीकडेच झालेल्या सायबर हल्ल्यामुळे त्या प्लॅटफॉर्मवरील महत्त्वपूर्ण माहितीऐवजी कॅसिनोची जाहिरात झळकताना दिसली. या प्रकारामुळे राज्यातील अनेक नागरिक अस्वस्थ झाले असून, डिजिटल पायाभूत सुविधांच्या सुरक्षेबाबत गंभीर प्रश्न निर्माण झाले आहेत.

या संदर्भात अधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीनुसार, महिला आणि बाल विकास विभागाच्या वेबसाइटसह एकूण ६२ सरकारी वेबसाइट्स या सायबर हल्ल्याचा बळी ठरल्या आहेत. मात्र, निवडकपणे फक्त महिला आणि बाल विकास विभागाच्या वेबसाइटचा उल्लेख प्रसारमाध्यमांमध्ये आल्याने व्यापक चित्र विकृत झाले आहे आणि एकंदर सायबर सुरक्षेच्या प्रश्नाकडे दुर्लक्ष झाले आहे, असे प्रशासनाचे म्हणणे आहे.

ही घटना अतिशय गंभीर असून, जी होस्ट सर्व्हरमध्ये झालेल्या सुरक्षाभंगामुळे घडली, ती पूर्णपणे अस्वीकार्य आहे. ही सार्वजनिक डिजिटल सेवांच्या अखंडतेवरच आघात करणारी बाब आहे, असे एका अधिकाऱ्याने सांगितले.

अधिकाऱ्यांनी यावेळी ही माहितीही स्पष्ट केली की, महिला आणि बाल विकास विभागाच्या वेबसाइटकडे वैध वेब सुरक्षा ऑडिटचे प्रमाणपत्र आहे. या प्रकाराची गंभीर दखल घेत संबंधित यंत्रणांकडे ही बाब पोचवण्यात आली असून, सध्या वेबसाइट तात्पुरती बंद करण्यात आली आहे. याशिवाय सायबर गुन्ह्यांविरोधात एफआयआर दाखल करण्यात येत असल्याची माहितीही त्यांनी दिली.

याबाबत अधिक माहिती स्पष्ट करताना आरोग्यमंत्री म्हणाले की , गोव्यातील जनतेला मी आश्वस्त करतो की या प्रकरणी कठोर जबाबदारी निश्चित केली जाईल. आमची टीम यासंदर्भात सखोल तपास करत आहे. भविष्यात अशा घटना टाळण्यासाठी आणि प्रणाली अधिक सुरक्षित करण्यासाठी आवश्यक ती पावले तातडीने उचलली जात आहेत.

राणे पुढे म्हणाले की , ही घटना केवळ एका विभागापुरती मर्यादित नाही; सार्वजनिक डिजिटल सेवांच्या अखंडतेवरच हे थेट आघात आहे. महत्त्वाचे म्हणजे, इतर ६१ संकेतस्थळेही याच उल्लंघनामुळे बाधित झाली आहेत.

सायबर हल्ल्याचे मूळ, हल्लेखोरांचे ठसे आणि संभाव्य डेटा गळती याचा तपास सुरू असून, सर्व संबंधित विभागांना आपापली सुरक्षा पावले तातडीने अद्ययावत करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.

# दोन महिन्यांसाठी बंद राहणार कला अकादमी

■ टीम दैनिक हेराल्ड

**पणजी, दि. १५ :** सार्वजनिक बांधकाम विभागाने कला अकादमीमधील दुरुस्तीच्या कामास तातडीने सुरूवात करण्याचे आदेश दिले असून, यासाठी विभागाच्या दोन उपविभागीय कार्यालयांना निर्देशित करण्यात आले आहे. मुख्यमंत्री प्रमोद सावंत यांच्याकडे नुकत्याच झालेल्या चर्चेनंतर आणि टास्क फोर्स समितीच्या शिफारशींच्या पार्श्वभूमीवर ही कारवाई करण्यात येत आहे.

या दुरुस्तीमुळे कला अकादमी आगामी दोन महिने, म्हणजेच जुलै आणि ऑगस्टदरम्यान, तात्पुरती बंद राहणार असून, या कालावधीत कोणतीही बुकिंग स्वीकारली जाणार नाही, अशी माहिती सार्वजनिक बांधकाम विभागाच्या एका वरिष्ठ अधिकाऱ्याने दिली.

दुरुस्तीचे काम याआधी नेमण्यात आलेल्या मूळ कंत्राटदाराकडूनच पूर्ण केले जाणार असून, मुख्यत्वे प्रकाश व्यवस्था, ध्वनी प्रणाली आणि ध्वनीशास्त्रीय दुरुस्तीवर भर दिला जाणार आहे. पूर्वी झालेले काम दर्जेदार नसल्याचे आढळल्यास, अतिरिक्त खर्च न करता संबंधित कंत्राटदाराकडूनच दुरुस्ती करून घेतली जाईल, असे अधिकाऱ्यांनी स्पष्ट केले.

दरम्यान, कला अकादमीमधील उघड्या सभागृहाचे काम स्वतंत्रपणे करण्यात येणार आहे, कारण हे काम यापूर्वीच्या मूळ प्रकल्पाच्या कक्षेत नव्हते, असेही अधिकाऱ्यांनी सांगितले.

कला राखोण मांडचे संयोजक देविदास आमोणकर यांनी हेराल्ड मिडियाशी बोलताना चिंता व्यक्त केली की, दुरुस्तीच्या नावाखाली पुन्हा नव्या खर्चाला निमंत्रण दिले जाऊ नये.सध्याचे दुरुस्तीचे काम हे पूर्वी तयार केलेल्या अंदाजपत्रकातच बसले पाहिजे. सरकारने याआधी हे काम चुकीच्या पद्धतीने केलेल्या व्यक्तीकडूनच नीटपणे करून घ्यावे आणि त्यासाठी अजिबात अतिरिक्त रक्कम देऊ नये, अशी ठाम भूमिका त्यांनी मांडली.

कला अकादमी मूळ रूपात पुनर्संचयित व्हावी, ही आमची मुख्य मागणी आहे. गेल्या पाच–सहा वर्षांत झालेल्या कामगिरीमुळे गोव्यातील सांस्कृतिक क्षेत्राला मोठा फटका बसला आहे. अनेक पिढ्यांनी या संस्थेमध्ये शिक्षण घेतले व सादरीकरण केले आहे.

पान २ ▶

# जुन्या बाजारातील ते पाच गाडे हटवणार

**डिचोली पालिका मंडळ बैठकीत निर्णय | विविध विषयावर चर्चा**

■ टीम दैनिक हेराल्ड

**डिचोली, दि. १५ :** डिचोली नगरपालिका बैठकीत पुन्हा जुन्या बाजार इमारतीचा जिना व त्याखाली असलेल्या बेकायदेशीर दुकानांचा विषय गाजला. हि दुकाने सोपो तत्वावर असून त्याजागी पक्की दुकाने साकारण्यात आली आहेत. त्यांना वीजजोडणीही आहे. त्यामुळे हि दुकाने बेकायदेशीर असून ती सुरक्षिततेच्या दृष्टीने तत्काळ हटविण्यात यावी, अशी मागणी नगरसेवकांनी केली. त्यामुळे सदर पाचही दुकाने हटविण्याचा निर्णय पालिका बैठकीत घेण्यात आला.

पालिका बैठकीत कामगार कर्मचारी आपली सेवा नेटकी बजावत नसल्याने अनेक बाबतीत फ टका बसतोय त्यांनी नियमित पणा व शिस्त ठेवावी, वसुलीबाबत विशेष मोहीम रबावावी आदी बाबतीत सुचना देण्यात आल्या अनेक विषय चर्चेसाठी आले. नगराध्यक्ष विजय कुमार वेरेकर सर्व नगरसेवव व आमदार डॉ चंद्रकांत शेट्ये यांनी बैठकीत उपयुक्त सूचना केल्या



**फोटो. डिचोली बाजारातील मार्केट इमारतीचा जिना व त्याखालील दुकाने.**

या इमारतीचा जिना हटवून त्याठिकाणी कमी जागेत लोखंडी जिना उभारण्याचा विषय बैठकीत आला. या विषयावरून पालिका बैठकीत बरीच गरमागरम चर्चा झाली. गेल्या पाच वर्षांपूर्वी हा विषय डिचोलीत बराच गाजला होता. जिना हटविताना त्याखाली असलेल्या दुकानांची इतरत्र सोय करण्याची मागणी काही नगरसेवकांनी मांडली. मात्र सदर दुकाने हि नगरपालिकेकडे दुकाने म्हणून नोंद नसून ती केवळ सोपो तत्वावर आहेत. तर त्यांची डिचोली नगरपालिकेने सोय करत जागा देण्यास नगरपालिका बंधनकारक नाही. त्यामुळे सदर दुकाने थेट सुरक्षिततेच्या मुद्द्यावरून हटविण्यात यावी, अशी जोरदार मागणी काही नगरसेवकांनी केली.

सदर सोपो देऊन बसणाऱ्या व्यापाऱ्यांनी त्याजागी थेट दुकाने तयार करून त्यास शेटर बसवली आहेत. तसेच १९९४ पूर्वी त्यांना वीज जोडणी देण्यात आली आहे. त्यामुळे सदर बेकायदेशीर दुकाने व वीज जोडणीचीही चौकशी करावी, अशी मागणी यावेळी नगरसेवकांनी केली.

हि बेकायदेशीर दुकाने त्या जागेवरून हटवून सदर जागा साफ करण्यात यावी. जर त्या ठिकाणी कोणतीही आपत्कालीन घटना घडली तर त्याला कोण जबाबदार ? नगरपालिका याची जबाबदारी घेणार का ? असा सवाल नगरसेवकांनी केला.

हि दुकाने हटविण्यात यावी अशी जोरदार मागणी नगरसेवकांनी लावून धरल्यानंतर ती दुकाने हटविण्याचा निर्णय पालिका बैठकीत घेण्यात आला.

पान २ ▶

# ग्रामस्थांच्या तीव्र निषेधानंतर मेगा गृहनिर्माण प्रकल्पाची मंजुरी रद्द

■ टीम दैनिक हेराल्ड

**मडगाव, दि. १५ :** स्थानिक ग्रामस्थांच्या तीव्र विरोधापुढे नमत, कुडतरी ग्रामपंचायतीने अखेर या भागातील वादग्रस्त मेगा गृहनिर्माण प्रकल्पास दिलेली मंजुरी रद्द केली आहे . माजी जिल्हा पंचायत सदस्य मोरेनो रेबेलो यांच्या नेतृत्वाखाली झालेल्या जोरदार निषेध आंदोलनामुळे या प्रकल्पाच्या विरोधात अनेक ग्रामस्थांनी सर्वसाधारण पंचायत बैठकीत थेट उपस्थित राहून आक्रमक भूमिका घेतली. परिणामी पंचायतीला ही मंजूरी रद्द करावी लागली

सदर प्रकल्पासंदर्भात मोठ्या प्रमाणात बेकायदेशीर वृक्षतोडीचे आरोप झाल्यानंतर स्थानिकांमध्ये संतापाची लाट उसळली होती. यामुळे पर्यावरणाचे मोठ्या प्रमाणावर आणि कायमस्वरूपी नुकसान झाल्याचा आरोप करण्यात आला. या तक्रारीची दखल घेत वन विभागाने संबंधित क्षेत्रात चौकशी सुरू केली असून, जमीन मालकाविरुद्ध गुन्हा नोंदवण्यात आला आहे. तसेच पंचायतीला तात्काळ काम थांबविण्याचे आदेश देण्यात आले होते.

प्रकल्पास देण्यात आलेली परवानगी हीही वादग्रस्त ठरली होती. स्थानिक वॉर्ड सदस्यांची अनिवार्य तपासणी न होता, तसेच प्री–बॉडी बैठक न घेता परवानगी कशी दिली गेली, असा सवाल ग्रामस्थांनी उपस्थित केला.

बैठकीदरम्यान आणखी एक गंभीर बाब समोर आली. संबंधित प्रकल्पस्थळापासून अवघ्या १00 मीटर अंतरावर राहणारे पंचही या मंजुरीविषयी अनभिज्ञ असल्याचे स्पष्ट झाले, ज्यामुळे निर्णयप्रक्रियेतील पारदर्शकतेबाबत मोठे प्रश्नचिन्ह निर्माण झाले.

सततचा जनदबाव आणि वाढता विरोध लक्षात घेता, पंचायतीने अखेर या प्रकल्पाची मंजुरी मागे घेतली. ग्रामस्थांनी या निर्णयाचे स्वागत करत, हा विजय लोकशाही मूल्यांचा आणि पर्यावरण रक्षणाच्या लढ्याचा असल्याचे म्हटले.

बैठकीनंतर माध्यमांशी संवाद साधताना मोरेनो रिबेलो यांनी सांगितले की , हा केवळ मायना परिसरातील रहिवाशांचा नव्हे, तर संपूर्ण कुडतरी गावाचा विजय आहे. पर्यावरणाचा ऱ्हास करणाऱ्या आणि लोकशाही प्रक्रियेची पायमल्ली करणाऱ्या कोणत्याही प्रकल्पांना ग्रामस्थ कदापि सहन करणार नाहीत, हे या निर्णयातून स्पष्ट झाले आहे.

कुडतरी मधील ही घटना स्थानिक प्रशासनाला जबाबदार धरणाऱ्या जागरूक नागरिकांच्या चळवळीचा महत्त्वपूर्ण टप्पा मानली जात आहे. गावकऱ्यांनी भविष्यातील कोणत्याही अनधिकृत विकास प्रकल्पाविरोधात सजग राहण्याचा निर्धार व्यक्त केला आहे.

# भारताच्या प्रगतीत डोनाल्ड ट्रम्प् आले आडवे !

## भारतात ' आय फोन ' उत्पादन करू नका -ट्रम्प् यांचा ॲपलला आग्रह

**वॉशिंग्टन, दि. १५ :**

अमेरिकेचे माजी राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी ॲपल इंक.चे मुख्य कार्यकारी अधिकारी टिम कुक यांना भारतात आय फोन , टॅब , लॅपटॉप इत्यादी वस्तूंची उत्पादन केंद्रे उभारण्याच्या योजनेपासून मागे हटण्याचा सल्ला दिला आहे. चीनवर अवलंबित्व कमी करण्याच्या उद्देशाने ॲपल भारतात उत्पादन वाढवण्याच्या तयारीत असताना ट्रम्प यांनी हे विधान केले.

आपल्या कतारदरम्यानच्या दौऱ्यात बोलताना ट्रम्प् म्हणाले की , काल माझी टिम कुक यांच्याशी थोडीशी खडतर चर्चा झाली,ते संपूर्ण भारतभरात उत्पादन यंत्रणा उभारत आहेत. मी त्यांना स्पष्टपणे सांगितले की , मला भारतात तुम्ही उत्पादन करावेसे वाटत नाही.ट्रम्प यांच्या म्हणण्यानुसार, या चर्चेनंतर ॲपलने अमेरिकेत उत्पादन वाढवण्याचे संकेत दिले आहेत.

ट्रम्प यांनी भारतावरील टीका करताना म्हटले की, भारतामध्ये जगातील काही सर्वाधिक टॅरिफ अडथळे आहेत, त्यामुळे तिथे अमेरिकन उत्पादने विकणे अत्यंत अवघड आहे. मात्र त्यांनी हेही नमूद केले की, भारत सरकारने आयात शुल्क कमी करण्याची तयारी दर्शवली असून, अमेरिका–भारत व्यापार कराराच्या दृष्टीने हालचाली सुरू आहेत.

ट्रम्प यांच्या या वक्तव्यामुळे ॲपलच्या भारतातील मोठ्या विस्तारयोजनेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. ॲपलने २०२५ च्या अखेरीस भारतातून अमेरिकेत विक्रीसाठी मोठ्या प्रमाणावर आयफोन पुरवठा करण्याचे उद्दिष्ट ठेवले आहे. सध्या ॲपलचे बहुतांश आयफोन चीनमध्ये तयार होतात, तर अमेरिकेत उत्पादन अत्यल्प आहे.

कोविड–१९ महामारीच्या काळात चीनमधील कठोर लॉकडाऊन आणि ट्रम्प प्रशासनाच्या संरक्षणात्मक धोरणांमुळे ॲपलने चीनबाहेरील पर्यायांचा शोध सुरू केला होता. यानंतर भारत हा एक महत्त्वाचा पर्याय म्हणून पुढे आला.

सध्या ॲपलचे प्रमुख पुरवठादार – फॉक्सकॉन टेक्नॉलॉजी ग्रुप आणि टाटा




इलेक्ट्रॉनिक्स , भारतातील दक्षिण भागात आयफोन उत्पादन केंद्रे चालवत आहेत. फॉक्सकॉन आणि टाटा, दोघेही नवीन प्लांट उभारत असून उत्पादन क्षमतेत मोठी वाढ करत आहेत, अशी माहिती ब्लूमबर्ग न्यूजने दिली आहे. टाटांनी अलीकडेच विस्ट्रॉन कॉर्पचा भारतातील व्यवसाय विकत घेतला असून पेगाट्रॉन कॉर्पचे काही ऑपरेशन्सही टाटा सांभाळत आहेत.

मार्च २०२५ अखेर संपलेल्या आर्थिक वर्षात ॲपलने भारतात सुमारे २२ अब्ज डॉलर मूल्याचे आयफोन तयार केले, जे मागील वर्षाच्या तुलनेत सुमारे ६0 टक्के वाढ दर्शवते.

२020 मध्ये भारत सरकारने इलेक्ट्रॉनिक्स क्षेत्रात मेक इन इंडिया' उपक्रमांतर्गत उत्पादन जोडीत प्रोत्साहन योजना सुरू केली. त्यानंतर ॲपलने भारतातील उत्पादन दुप्पट केल्याचे स्पष्ट झाले आहे. कंपनीने सुरुवातीला जुन्या आयफोन मॉडेल्सच्या असेंब्लीपासून सुरुवात केली होती, मात्र सध्या ती प्रो श्रेणीसह उच्च दर्जाचे सर्व मॉडेल्स भारतात तयार करते.फॉक्सकॉन, विस्ट्रॉन आणि पेगाट्रॉन हे ॲपलचे कंत्राटी उत्पादक असून, यापैकी विस्ट्रॉन आणि पेगाट्रॉनचा ताबा आता टाटा समूहाकडे आहे. उत्पादन विस्तारामुळे ॲपल आणि त्याच्या कंत्राटी भागीदारांना मोठ्या प्रमाणावर पीएलआय योजनेंतर्गत अनुदान मिळाले आहे.

२०२३–२४ मध्ये फॉक्सकॉनला सर्वाधिक २,४५0 कोटी रुपयांचे अनुदान मिळाले होते. मात्र, २०२४–२५ मध्ये फॉक्सकॉनला कोणतेही प्रोत्साहन मिळाले नसल्याचे आकडेवारीवरून दिसते. याच वर्षी सॅमसंगला सर्वाधिक ९५८ कोटी रुपयांचे अनुदान देण्यात आले.

अमेरिका–चीन व्यापार तणावामुळे भारतीय उत्पादकांना काही प्रमाणात फायदा झाल्याचे मानले जात आहे. अमेरिकेने चिनी वस्तूंवर १४५ टक्क्यांपर्यंत आयात शुल्क लादल्याने अनेक अमेरिकी ग्राहकांनी भारतीय उत्पादकांकडे वळण्यास सुरुवात केली. यामुळे ॲपलसारख्या कंपन्यांना चीनमधून भारतात उत्पादन स्थलांतर करण्याचा आधार मिळाला.

तथापि, अलीकडे अमेरिका आणि चीन यांच्यात व्यापार करार झाला असून, शुल्क दरांवरील तणाव काहीसा निवळण्याची चिन्हे आहेत. यामुळे ॲपलसारख्या कंपन्यांच्या पुरवठा साखळीतील धोरणात बदल होण्याची शक्यता आहे. चीनमधील उत्कृष्ट तांत्रिक कौशल्य आणि कुशल मनुष्यबळ भारतापेक्षा अद्यापही पुढे असल्याचे मानले जाते.